# कासव संवर्धन- स्थानिकांचा पुढाकार

## प्रस्तावना:

सागरी कासवांचे अस्तित्व हे त्या चांगल्या समुद्र किना-याचे प्रतिक आहे.

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर एकूण ५ जातीची कासवे आढळतात, हिरव्या पाठीचे (*Chelonia mydas*), हॉक्सबील (*Eretmochelys imbricata*), लॉगरहेड (*Caretta caretta*), ऑलिव्ह रिडले (*Lepidochelys olivacea*) आणि लेदरबॅक (*Dermochelys coriacea*)

सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले जातीची कासवे अंडी देण्यासाठी येतात असे आढळून आले आहे. परंतु स्थानिकांकडून सदरची अंडी खाल्ली जातात असे निर्देशनास आले आहे.

## उद्देश:

- कासवांची घरटी यापूर्वी आढळून आलेल्या व सद्यपरिस्थित असलेल्या जागांचा नकाशा तयार करणे
- पिल्लांच्या जन्मदराचे मुल्यांकन व मृत्युची कारणे.
- कासव संवर्धनाची गरज व प्दधती याबाबत स्थानिकांमध्ये जनजागृती करणे.
- कासवांना सिंधुदुर्ग किनारपट्टीवर अंडी देण्यास असणारे धोक्यांचे मुल्यांकन व संवर्धनाच्या योजना

## कार्यक्षेत्र:

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड, मालवण व वेंगुर्ला तालुक्यातील संपूर्ण १२० कि.मी. ची किनारपट्टी

## परिणाम:

| साल | घरट्यांची ठिकाणे | घरट्यांची संख्या |
|---|---|---|
| २००७-०८ | २ | ७ |
| २००९-१० | २ | ६ |
| २०१०-११ | ३ | ८ |
| २०११-१२ | ३ | ८ |
| २०१२-१३ | १६ | ३६ |
| २०१३-१४ | १० | ३८ |




नकाशा: सन २०१२-१३ या वर्षात ऑलिव्ह रिडले (*Lepidochelys olivacea*) कासवांची घरटी आढळून आलेली ठिकाणे (पिवळ्या रंगात) व त्यापूर्वी आढळलेली ठिकाणे (लाल रंगात).



### फलीत:

- ३१ प्रशिक्षीत हॅचरी व्यवस्थापक
- १३ नवीन जागांचा शोध
- घरट्यांचे संरक्षण व पिल्ले समुद्रात सोडणे याकामी स्थानिकांचा सहभाग
- अंड्यातून पिल्ले बाहेर येण्याचे ६०.८० % एवढे यश (जन्मदर)




सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत आढळून आलेली घरट्यांची संख्या




कासवांच्या घरट्यांच्या संरक्षणासाठी संरक्षक जाळी



कासवांची पिल्ले समुद्रात सोडण्यासाठी स्थानिकांचा सहभाग